महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वयत्त संस्था)

४१२/सी, के.एम.मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११०१६

फोन : ०२०–२५६७७१८९

**Web:** www.msihmctpune.org.in **Email:** principal.msihmcpune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.मराहॉमॅकेटेपुणे/निर्लेखन विल्हेवाट/2023–24/31 दिनांकः 11/01/2024

## निर्लेखित साहित्याची विक्री सुचना

या कार्यालयातील जुन्या कालबाह्य, निरूपयोगी, निर्लेखित साहित्याची विक्री "जिथे आहे जसे आहे" स्थितीत खालील अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे, त्याकरीता अनुभवी व इच्छुक खरेदीदारांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यासंदर्भातील अधिक माहिती या कार्यालयाच्या सुचना फलकावर/भांडार विभागात कार्यालयीन वेळेत मिळु शकेल.

### अटी व शर्ती

1. लिलावात भाग घेणा–याने दोन पाकीटे देणे आवश्यक आहे. दोन्ही पाकीटाच्या मागे आपला पत्ता लिहावा.
   - 1.1. एका पाकीटात आपले पॅनकार्ड, व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र यांची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा/दरपत्रक स्वकारले जाणार नाही.
   - 1.2. दुस–या पाकीटावर प्रपत्र–अ भरून त्यावर विक्रीप्रक्रियेचे दरपत्रक (तंत्रज्ञान साहित्य) असा उल्लेख करावा त्याखाली "Principal, Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology, Shivajinagar, Pune" हा पत्ता लिहावा व "Principal, Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology, Shivajinagar, Pune" यांचे नावाचा अनामत रक्कम म्हणुन रू.1000/– चा डिमांड ड्राफ्ट असणे आवश्यक आहे, अन्यथा निविदा/दरपत्रक रद्द समजण्यात येईल.
2. सदरचे साहित्य इच्छुक लिलावात भाग घेणा–यांना 11/01/2024 ते 20/01/2024 (अंतिम दिनांक) या कालावधीत दुपारी 02:00 ते 03:00 या वेळेतच पाहता येतील.
3. निविदा/दरपत्रके अंतिम दिनांकापर्यंत दुपारी 03:30 पर्यंत वरील सर्व अटी/शर्तीनुसार सीलबंद लखोटयात स्वीकारली जातील. त्यानंतरची निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत अथवा त्यांचा विचार केला जाणार नाही अथवा कोणत्याही प्रकारचा टपाल विलंब ग्राह्य धरला जाणार नाही, याची लिलावात भाग घेणा–यांनी कृपया नोंद घ्यावी.
4. प्रत्यक्ष साहित्य जागेवर आहे त्यास्थितीत पाहिल्यानंतरच आपले दर प्रपत्र–अ मध्ये देण्यात यावे, नंतर कोणत्याही प्रकारची तकार चालणार नाही.
5. सोबत दिलेल्या प्रपत्र–अ मध्ये सदर साहित्याची शासकीय नियमानुसार अपेक्षित किंमत दिली आहे, या किंमतीपेक्षा तुलनेने सर्वात जास्त किंमत देणा–यास सदर साहित्य विकले जाईल, याची नोंद घ्यावी.
6. निविदा/दरपत्रक उघडण्याच्या वेळी केवळ निविदा भरलेल्यांनाच उपस्थित राहता येईल. त्याकरीता लिलावात भाग घेणा–यांचे केवळ एकच प्रतिनिधी उपस्थित राहु शकतील, प्रतिनिधीला ओळखीचा पुरावा देणे आवश्यक आहे.
7. ज्यांचे निविदा/दरपत्रक मंजुर झाले आहे, त्यांनी सदर साहित्य स्वखर्चाने आहे त्यास्थितील व ठिकाणावरून, संस्थेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान न करता आदेश मिळाल्यापासुन तीन दिवसांच्या आत घेउन जाणे. सदर साहित्य नेताना संस्थेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान झाल्यास, भरपाई करून द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वयत्त संस्था)
४१२/सी, के.एम.मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११०१६
फोन : ०२०–२५६७७१८९
Web: www.msihmctpune.org.in
Email: principal.msihmcpune@dtemaharashtra.gov.in

8. यशस्वी बोलीधारकास साहित्याची पूर्ण रक्कम डिमांड ड्राफ्ट द्वारे भरल्यानंतरच माल ताब्यात दिला जाईल. रोखीने/ धनादेशाद्वारे रक्कम स्वीकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
9. खरेदी केलेले साहित्य पूर्ण रक्कम अदा केल्यानंतर विहित मुदतीत ताब्यात न घेतल्यास, अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल व त्यानंतर सदर साहित्यावर आपला हक्क राहणार नाही.
10. खरेदी केलेले साहित्य संस्थेबाहेर नेताना पहारेक–यास गेटपास दाखवणे आवश्यक आहे.
11. खरेदी केलेले साहित्यावर कोणत्याही प्रकारचा कर अथवा खर्च लागल्यास तो आपण स्वतः भरावयाचा आहे. संस्था यातील कोणतीच रक्कम देणार नाही.
12. निविदा/दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सदर साहित्य विहित मुदतीत ताब्यात घेण्याची जबाबदारी आपली आहे. संस्थेच्या आवारात पडलेले आपण खरेदी केलेल्या साहित्याची जबाबदारी संस्थेची राहणार नाही.
13. काही तांत्रिक कारणास्तव साहित्य विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय या कार्यालयाचा राहील.
14. कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रक मंजूर अथवा ना–मंजूर करण्याचा किंवा संपूर्ण खरेदीप्रकिया रद्द करण्याचा किंवा त्यात फेरबदल करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच आपणाकडुन अटी व शर्तीचा भंग झाल्यास आपल्याला दिलेला विक्री आदेश रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.
15. विक्रीच्या तारखेत बदल झाल्यास त्याबाबत आपल्याला कळविण्यात येईल.

(डॉ.अपर्णा अ.देशपांडे)
प्राचार्य
महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे.

प्राचार्य
महाराष्ट्र राज्य इन्स्टीट्यूट
ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड
केटरींग टेक्नॉलॉजी,
शिवाजीनगर, पुणे-४११०१६

प्रत : नोटीस बोर्ड, संस्थेचे संकेतस्थळ